परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग
क्र. मभा/२/कावि/६६३/२०१६
दि.२१/९/२०१६

**विषय – विविध विभागाच्या निविदा उघडणेच्या कामकाजाबाबत.**
**संदर्भ – दवनि/१ /कावि/१४६/२०१३ दि. ७.५.२०१३**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ज्या निविदा प्रसिध्द केल्या जातात. अशा निविदा उघडणेचे कामाकरिता निविदा उघडणे कमिटी स्थापन केली असून सदरचे कामकाज मध्यवर्ती भांडार विभागामार्फत चालू आहे. निविदा उघडणेचे कामकाज दोन कमिटीमार्फत चालते १) र.रु. ५० लाखांचे मर्यादेवरील कामासाठी एक समिती २) र.रु ५० लाखांचे आतील मर्यादेसाठी एक समिती. सद्यस्थितीत निविदा उघडणेचे कामामध्ये काही अडचणी दिसुन आल्या आहेत

माझे असे निदर्शनास आले आहे की, निविदा उघडणेचे वेळी संबंधित निविदा लिपिक कमिटी मेंबरच्या Degital key घेऊन येतात. निविदा उघडणेचे कमिटी मेंबरमध्ये ३ मेंबर असले तरी निविदा कक्षामध्ये निविदा उघडणेचे वेळी फक्त निविदा लिपिक व भांडार विभागातील लेखापाल व निविदा उघडणारे कर्मचारी असतात.व संबंधित कमिटी मेंबरची Degital key घेऊन निविदा उघडणेस भाग पाडले जाते.

सबब सदर परिपत्रकान्वये सर्व शाखाप्रमुख / शाखा अधिकारी यांना कळविणेत येते की, विभागातील निविदा उघडणेचे वेळी र.रु. ५० लाखाचे वरील निविदा कमिटीमधील १) विभागप्रमुख २) भांडार प्रमुख ३) मुख्य लेखापरिक्षक / मुख्य लेखापाल तसेच ५० लाखाचे आतील निविदा समितीमधील १) संबंधित कार्यकारी अभियंता/विभाग प्रमुख २) लेखापाल भांडार ३) लेखापाल लेखापरिक्षण विभाग / लेखाधिकारी लेखा विभाग यांनी स्वत:ची Degital key सह निविदा कक्षामध्ये समक्ष उपस्थित राहून निविदा उघडणेचे कामकाज करावे.सदर निविदा उघडणेचे वेळी संबंधित निविदा समिती मधील एकही सदस्य उपस्थित नसेल तर सदरची निविदा उघडणेत येणार नाही याची सर्व जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

२१.९

सहा.आयुक्त(भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

प्रत – १) मा.आयुक्त सो.
२) मा.अति.आयुक्त सो
यांना माहितीसाठी सादर

[Title]